वनविभागाचे संगणकीकरण (२४०६ ८६६९) या राज्य योजनेतंर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध अनुदानापैकी रू.२६६.६४ लक्ष रक्कम वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एफएलडी-२०१९/प्र.क्र.१५५/फ-१०

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :-१७.०५.२०१९

वाचा :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क्र.५७/ब-१, दि.०१.०४.२०१९

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.४३ (८६६९)/२०१९-२०/८९, दि.२९.०४.२०१९.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१५/आयसीटी/प्र.क्र.FP १९-२०/१६९/१९-२०, दि.१०.०५.२०१९.

प्रस्तावना :-

शासकीय कामे अधिक गतिमान, पारदर्शी व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने संपूर्ण वन विभागाचे संगणकीकरण करण्याच्या हेतूने वनविभागात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने दि.०५.१०.२०११ व दि.०४.०८.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

वार्षिक योजना सन २०१९-२० करिता "वनविभागाचे संगणकीकरण" (२४०६ ८६६९) या योजनेकरीता एकूण रु.८००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे . प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये एकूण रु.१४०१.९२ लक्ष चालू बाब प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये मे.युनिबेरी प्रा.लि. यांचेमार्फत Mahaforest Platform App विकसित करण्यासाठी ४७९.३१ लक्ष इतकी रक्कम वितरीत करण्याची देखील विनंती केली आहे.

दि.१ एप्रिल,२०१९ ते दि.३१ जुलै, २०१९ या कालावधीत वितरण करण्यासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर रू.२६६.६४ लक्ष इतका निधी उपलब्ध करण्यात आला असल्याचे वरील शासन निर्णय संदर्भ क्र.२ अन्वये कळविण्यात आले आहे. सबब, सदर रक्कम रुपये २६६.६४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वनविभागाचे संगणकीकरण करणे या योजनेअंतर्गत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विभाग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील संदर्भाधीन पत्रांन्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु.२६६.६४ लक्ष निधी **(२८-व्यवसायीक सेवा रु.४० लक्ष, ५०- इतर खर्च रु.२२६.६४ लक्ष)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तथापि, **मे.युनिबेरी प्रा.लि. यांचेमार्फत Mahaforest Platform App विकसित करण्यासाठी ४७९.३१ लक्ष इतकी रक्कम वितरीत करण्यासंदर्भातील प्रस्तावाच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.**

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर / नवीन क्षेत्रावर / नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर योजनेकरीता वितरित केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात येईल याची देखील दक्षता घ्यावी. तसेच वन विभागाचे संगणकीकरण करणे या योजनांकरीता वेळोवेळी निर्गमित केलेल्या धोरणात्मक शासन निर्णयांमधील अटी व शर्तीची पूर्तता केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी. वितरीत करून घेतलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधीमध्ये काढून ठेवता येणार नाही.

३. सदर योजनेवर होणारा खर्च महसूल व वन विभाग, मागणी क्रमांक:- सी-७, प्रधान लेखाशिर्ष :- २४०६, वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, राज्य योजनांतर्गत योजना, (१७) वन विभागाचे संगणकीकरण, (१७) (०१) वन विभागाचे संगणकीकरण (२८-व्यावसायिक सेवा, ५० - इतर खर्च), (२४०६ ८६६९) या लेखा शिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.०१.०४.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र/१००८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५.०५.२००९ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१७१६५४०७०८१९ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

CHANDRASHEKHAR
D TARANGE

Digitally signed by CHANDRASHEKHAR D TARANGE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=fb8c9383a2159ef0954b8bea7a4de7769b9a2308eccebd89cbd1dd3f1964f665,
postalCode=400032, street=REVENUE AND FOREST,MADAM CAMA ROAD,MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=58ec18904b2f9beed6623c280f52b95e697b2a942aea9b3167f26447ae26a806,
ou=REVENUE AND FOREST , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=CHANDRASHEKHAR D
TARANGE
Date: 2019.05.17 17:03:39 +05'30'

(चंद्रशेखर तरंगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२
८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२
९) कार्यासन ब-१/ फ-२, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
१०) निवडनस्ती, कार्यासन फ-१०.